## थोडक्यात...

### परभणी ते पुरुषोतमपुरी बस सेवा प्रारंभ




(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**बीड**-आधिक मास निमीत्त परभणी ते पुरुषोत्तमपुरी - मानवत पाथरी माजलगाव ते पुरुषोत्तमपुरी असा बस प्रवास सुखकारक होणार आहे शिवाय भाविकांची गर्दी विचारात घेता माजलगाव आगारातुन ही प्रत्येक तासास एक बस सेवा सुरु केली आहे तर परभणी आगारातुन सकाळी ६:३० तदनंतर ७:३० वाजता दुध खर्च वाढता राहील दररोज एक लक्ष भावी भक्त गण पुरुषोत्तमाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी ने हजर असतात.


### आठवड्यातून फक्त ३ दिवसच शाळा भरवा

(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)




**परभणी**- डिझेल पेट्रोल टंचाई चे सावट दिवंसेदिवस वाढतच चालले आह युद्धजन्य परस्थिती कायम राहील्यास डिझेल / पेट्रोल ची टंचाई आनखीनच भासणार आहे या वर ऊपाय म्हणून शहरातील सर्व शाळा आठवडयातून ३ दिवस प्रत्यक्ष शाळा व ईतर दिवस ऑनलाईन शाळा भरवा अशी मागणी स्कुल बस राज्य असोसेशीयन संघटनेने राज्य शिक्षण विभागाकडे केली आहे राज्य शासन यावर काय तोडगा काढते या कडे शिक्षक पालक विद्यार्थी यांचे लक्ष लागले आहे.

### बीड येथील एलआय सी वरिष्ठ व्यवस्थापक पदी मिलींद चौधरी यांनी पदभार स्विकारला



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**बीड**- भारतीय आयुर्विमा महामंडळ एल आय सी बीड च्या वरीष्ठ व्यवस्थापक पदी मूळ पाथरी जि . परभणी चे रहिवाशी मिलींद चौधरी यांनी आज पदभार स्विकारला या पूर्वी त्यांनी छ.संभाजी नगर मिल कॉर्नर शाखा सिल्लोड , ऊदगीर येथे शाखा व्यवस्थापक म्हणून यशस्वी कारर्कीद पूर्ण केली आहे मागील महिन्यात त्यांची पदोन्नती सहाय्यक मुख्य व्यवस्थापक संवर्गात झाली असून आज त्यांनी बीड येथिल वरीष्ठ व्यवस्थापक पदाची सुत्रे स्विकारली पाथरी जि . परभणी येथिल ऊप नगराध्यक्ष अलोक चौधरी यांचे ते चुलत बंधु आहेत एम.एस्सी बीएड असून काही काळ नवोदय विद्यालय वसमत येथे ही ते कनिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत होते स्पर्धा परिक्षेतुन त्यांची एल आय सी मध्ये १९९५ मध्ये सुरुवातीस सेलू येथे नियुक्ती झाली होती

### तेलंगाणा राज्याचे वक्फ बोर्ड अध्यक्ष सय्यद अज्मतुल्ला हुसैनी यांच्याशी सादात पठाण यांची भेट

(ज्ञानेश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)



**कळमनुरी**- तेलंगाना राज्याचे वक्फ बोर्ड हुसैनी यांच्याशी कळमनुरी शहरातील सादात पठाण सदिच्छा भेट घेतली. भेटीदरम्यान विविध विषयावर चर्चा घडली ज्यात समाजाप्रति, वक्फ मालमत्तांचे संरक्षण तसेच अल्पसंख्याक समाजाच्या तसेच अनेक प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. हुसैनी यांनी केलेल्या कामांची व समाजाच्या प्रगतीसाठी सुरू असलेल्या उपक्रम बाबत तसेच पुढील काळातही सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा विश्वास व्यक्त केला ही भेट अत्यंत आत्मीयतेच्या वातावरणात पार पडली असून, समाजाच्या विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शेतकरी वाचला, तरच देशाची अर्थव्यवस्था मजबूत राहील!

## आ.डॉ.गुट्टेंची कृषी अधिकारी व केंद्र चालकांना भावनिक साद : बनपिंपळा येथे कृषी विषयक नियोजन बैठक उत्साहात संपन्न



(अली चाऊस/दै.धर्मयोध्दा)

**गंगाखेड**- शेती हा केवळ व्यवसाय नाही, तर आपल्या ग्रामीण संस्कृतीचा आत्मा आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. आणि त्याच्या कष्टावर संपूर्ण समाजाचे जीवन उभे आहे. मात्र आजचा शेतकरी अनेक संकटांशी दोन हात करत आहे. बदलते हवामान, वाढते उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि बनावट निविष्ठांचा वाढता धोका यामुळे तो चिंतेत आहे. अशावेळी कृषी विभागाचे सर्व अधिकारी आणि कृषी केंद्र चालक यांची जबाबदारी केवळ शासकीय कामकाजापुरती मर्यादित राहात नाही, तर त्यांनी शेतकऱ्यांचा विश्वास जपण्याची नैतिक जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. कारण, कारण शेतकरी वाचला, तरच आपले गाव वाचेल आणि गाव वाचले, तरच आपल्या देशाची अर्थव्यवस्था मजबूत राहील, अशी भावनिक साद स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी कृषी अधिकारी व केंद्र चालकांना घातली.

तालुक्यातील मौजे.बनपिपळा येथील त्यांच्या निवासस्थानी कृषी विषयक नियोजन बैठक उत्साहात संपन्न झाली. त्यामध्ये सर्व कृषी अधिकारी व कृषी केंद्र चालक सहभागी झाले होते. त्यावेळी त्यांना मार्गदर्शन करताना आ.डॉ.गुट्टे बोलत होते. याप्रसंगी त्यांनी कृषी विभागाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच सद्यपरिस्थितीत शेतकरी बांधवांना दिलासा मिळावा आणि त्यांच्या अडचणी सोडवाव्यात, यासाठी आवश्यक त्या सूचना सुद्धा केल्या. शिवाय, शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळावा आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधान असावे, यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून कटिबद्ध असल्याचे आवर्जून नमूद केले.

पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, आपल्या तालुक्यातील एकाही शेतकऱ्याची फसवणूक होता कामा नये, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. बनावट खत, निकृष्ट बियाणे किंवा चुकीचे मार्गदर्शन यामुळे शेतकऱ्यांचे फक्त आर्थिक नुकसान होत नाही, तर त्याच्या आशा आणि स्वप्नेही उद्ध्वस्त होतात. म्हणूनच अशा गैरप्रकारांविरोधात कठोर भूमिका घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासनाने सजग राहून वेळोवेळी तपासणी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी. कारण, आपल्या शेतकरी बांधवांच्या घामाचा प्रत्येक थेंब अनमोल आहे. त्यामुळे खत आणि बियाणे खरेदी करताना कुणीही तुमची फसवणूक करू नये, ही माझी प्रामाणिक इच्छा आहे. बाजारभावापेक्षा जास्त दराने, चढ्या भावाने किंवा लुबाडून कुणी खते, बी-बियाणे विकत असेल, तर शेतकरी बांधव एकटे नाहीत. अशा अन्यायाविरुद्ध मी स्वत: कायम त्यांच्यासोबत असेन.

आज काळ झपाट्याने बदलतो आहे आणि शेतीचे स्वरूपही बदलत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, हवामानानुसार पीक नियोजन, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन आणि बाजारपेठेतील स्पर्धा या सर्व गोष्टी शेतकऱ्यांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचल्या पाहिजेत. कृषी केंद्र हे फक्त खत-बियाणे विकण्याचे ठिकाण नसून, ते शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांचे मार्गदर्शन केंद्र झाले पाहिजे. शेतकऱ्याला योग्य सल्ला, योग्य माहिती आणि योग्य दिशा वेळेवर मिळाली, तर तो संकटावर मात करू शकतो. त्यामुळे अधिकाऱ्यांनी आणि कृषी केंद्र चालकांनी संवेदनशीलतेने आणि प्रामाणिकपणे काम करणे ही काळाची गरज आहे. शिवाय, अधिकारी, कृषी केंद्र चालक आणि लोकप्रतिनिधी यांनी समन्वय ठेवून काम केले, तर निश्चितच शेती क्षेत्रात सकारात्मक बदल घडू शकतो, असाही विश्वास आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केला.

दरम्यान, येणाऱ्या हंगामात आपल्या एकाही शेतकऱ्याची खत-बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत फसवणूक होता कामा नये. असे आढळून आल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करून परवाने रद्द करावेत. भरारी पथकांमार्फत अचानक तपासण्या करण्यावर भर द्यावा. सर्व निविष्ठांचे दर फलकावर लावणे बंधनकारक करा, तरीही चढ्या दराने विक्री केल्यास थेट कारवाई करा. आणि सर्व निविष्ठा वेळेवर आणि रास्त दरात उपलब्ध होतील, याची पूर्ण काळजी घ्यावी. शिवाय, अधिकाऱ्यांनी व कृषी केंद्र चालकांनी एकमेकांशी समन्वय ठेवून काम करावे, असेही निर्देश आ.डॉ.गुट्टे यांनी बैठकीदरम्यान दिले. यावेळी कृषी विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि कृषी केंद्र चालक आदी उपस्थित होते.

> महायुती सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी!
> येत्या काही दिवसांमध्ये खतांच्या, बियाणांच्या आणि इतर शेतीमालाच्या किंमती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. जागतिक बाजारपेठेतील चढउतार याला कारणीभूत आहेत. त्यामुळे राज्यातील महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मोठे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार पीक कर्जासाठी आता कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी किंवा ग्रामीण बँकेतून कर्ज सहज उपलब्ध करून देण्यात येईल. शिवाय कागदपत्रांची अडवणूक न करता, सुलभ पद्धतीने ३ लाखांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याजदराने देण्याची योजना सरकारने अधिक बळकट केली आहे. शिवाय,नमो शेतकरी महासन्मान निधी, एक रुपयात पीक विमा आणि मोफत वीज योजना अशा अनेक योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. कारण, संकटाच्या काळात शेतकरी एकटा नाही, हे सरकार दाखवून देत आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी नमूद केले.

## आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांना कॉँग्रेसतर्फे अभिवादन



**परभणी**- दिनांक २७ मे रोजी परभणी शहर व जिल्हा कॉँग्रेस कमिटी तर्फे आज शनिवार बाजार येथील राजीव भवन येथे आधुनिक भारताचे शिल्पकार, देशाचे पहिले पंतप्रधान व भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास सुहास पंडित, दिगंबर खरवडे , सत्तार पटेल, रवी रत्नपारखे यांच्यासह कॉँग्रेस पक्षाचे बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी पंडित नेहरू यांच्या देशाच्या जडणघडणीत असलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

## खरीप पेरणीपूर्वी डीएपी व युरिया खतांचा तुटवडा; किसान मोर्चाचे कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

(संतोष तायडे /दै.धर्मयोध्दा)

**बोरी** - जिंतूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग असून खरीप हंगामाची पेरणी जवळ आली आहे. मात्र, पेरणीसाठी अत्यावश्यक असलेल्या डीएपी व युरिया खतांचा बाजारात तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. खतांची तातडीने उपलब्धता करून द्यावी, या मागणीसाठी किसान मोर्चाच्या वतीने आज तालुका कृषी अधिकारी जिंतूर यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, जिंतूर तालुक्यातील शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीला लागले आहेत. परंतु बाजारात डीएपी व युरिया खत सहज उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी किसान मोर्चाचे अध्यक्ष दिनकर चौधरी, गंगाधर देशमुख, अशोक शिंपले, वामनराव शिंपले, पंडित दादा घोलप व मुंजाभाऊ कंठाळे उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर खत उपलब्ध करून देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# गायीला राष्ट्रीय पशु म्हणुन घोषीत करा - विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिल च्या वतीने जिल्हा प्रशासनाला निवेदन

(महेंद्र पुरी/ दै.धर्मयोध्दा)



**हिंगोली**- विराट राष्ट्रीय लोकमंच काऊसींल (एनजीओ) हिंगोलीच्या वतीने मा.जिल्हाधिकारी हिंगोली मार्फत आपणास सविनय सादर करण्यात येते की, भारत हा कृषी प्रधान व संस्कृती प्रधान देश असुन भारतामध्ये विविध जाती, धर्माचे, विचारसरणीचे, संस्कृतीचे पालन करणारे लोक एकत्रितपणे अनेक वर्षापासुन राहतात. भारतीय धर्मग्रंथ वेद पुराण, हिंदु संस्कृतीमध्ये तसेच अनेक धर्मामध्ये गायीला आईसारखे स्थान देत गोमाता म्हटल्या जाते. भारत हा कृषिप्रधान देश असुन गाय व बेल हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणुन काम करतात. गायीचे दुध विशेष करुन लहान मुलांच्या पोषणासाठी, गोमुत्र शेण धार्मिक विधी तसेच सेंद्रिय खते आणि जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी केला जातो तर शेतीच्या अनेक कामासाठी बैलाचा वापर शेतकरी करीत असुन त्यांची काळजी कुटुंबातील सदस्याप्रमाणे घेतली जाते. गायी आणि बेलाप्रती कृतज्ञता आणि आदर दर्शविण्यासाठी सणही साजरे करुन त्यांची पुजासुध्दा केली जाते. तर दुसरीकडे गोहत्या आणि गोरक्षण या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आपले आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वार्थ साधण्यासाठी राजकारण करत मोठ्या प्रमाणावर समाजामध्ये व्देष पसरविण्याचे काम केले जात आहे. आपसी वादविवादाला अनेक ठिकाणी जातीय रंग देत समाजामध्ये तेढ पसरविण्याचे काम गाय, गोवंशाच्या नावाखाली केले जात आहे. अनेक ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असुन अनेक निरपराध लोकांना आपला जिवसुध्दा गमवावा लागलेला आहे. अश्याप्रकारच्या अनेक घटना घडत असतांना केंद्र ब बिबिध राज्य शासनाव्दारे विदेशी मुद्रा व मोठ्या प्रमाणावर कर मिळविण्यासाठी बिफच्या कारखान्याना परवानगी दिली जात असुन कारखान्याचे नाव एका धर्मातील नावाला अनुसरुन तर कारखान्याचे मालक दुसऱ्या धर्माचे असा सर्रास प्रकार सुरु आहे. तरी गोवंश, गोरक्षण, गोहत्या यावरुन सुरु असलेले राजकारण आणि सदर प्राण्यापुढे मानवी जिवनाचे कमी होत असलेले महत्व पाहता गायीला राष्ट्रीय पशु म्हणुन घोषीत करण्यात यावे आणि अनेक निरपराध लोकांचे जीव वाचविण्यासाठी आणि यातुन होणारे राजकारण व अप्रिय घटना कायमस्वरुपी बंद करण्यासाठी सहकार्य करावे हि विनंती चे निवेदन मा. जिल्हाधिकारी हिंगोली मार्फत मा. राज्यपाल महोदय,मा. मुख्यमंत्री महोदय, यांना सादर करण्यात आले या निवेदनावर शेख नईम शेख लाल संस्थापक सचिव तथा राष्ट्रीय अध्यक्ष,शेख नौमान नवेद, राष्ट्रीय संचालक,शेख बासीत जिल्हाध्यक्ष,रवी बन्सीलाल जैस्वाल जिल्हा उपाध्यक्ष शेख आवेज,शेख शाहनवाज हुसेन, जी.प्र.महासचिव पठाण साजीद खान शहराध्यक्ष सतिश लोणकर,पठाण रऊफ खान,मो. आमेर,मो.परवेज बागबान,शेख मुदस्सीर,पठाण माझ खान, व ईतर पदाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी बोलावली जिल्हा परिषद अभियंता राज्य संघटने समवेत बैठक

(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)



**बीड** - राज्यातील जिल्हा परिषद अभियंता संघटने समवेत मागण्यावर तोडगा काढण्यासाठी बुधवारी दि . २७ मे २६ रोजी मंत्रालय मुंबई येथे बैठकीचे आयोजन केले आहे प्रामुख्याने प्रत्येक जिल्हयातील तालूक्यात बांधकाम ऊप विभाग स्थापन झाल्यास ग्रामिण विकासासाठी चालना मिळेल सध्या तिन तालुक्यासाठी एक ऊप विभाग असल्याने ग्रामीण विकासाची कामे पूर्ण करण्यास अनेक अडचणी येत आहेत जिल्हा परिषद बांधकाम ऊप विभागामार्फत जिल्हा नियोजन समिती मार्फत मान्य केलेली कामे यात ग्रामिण रस्ते मजबूती व निर्मीती प्राथमिक आरोग्य केंद्रे सार्वजनिक सभागृहे तिर्थ क्षेत्र विकास जि.प .शाळांचे बांधकामे रस्ते पुल इत्यादी कामे निर्मीती देखभाल व दुरुस्ती साठी ची महत्व पूर्ण जबाबदारी ही बांधकाम ऊप विभागाकडे असते प्रत्येक तालूक्यास ऊप विभाग नव्याने स्थापन झाल्यास ग्रामिण विकासास चालना मिळणार आहे ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचे काम कमी प्रमणात असतांना ही प्रत्येक तालुक्याला ऊपविभाग कार्यरत आहे त्याच प्रमाणे बांधकाम विभागाने ही ग्रामिण विकासासाठी तालूका तिथे ऊपविभाग स्थापन व्हावा या संदर्भात मुंबई ऊच्च न्यायालयाच्या छ. संभाजी नगर खंडपीठात दाखल केलेल्या याचिका क्र . ९१७४ / २०१३ नुसार न्यायालयाने ही ग्रामिण भागातील विविध कामांची वाढती संख्या व ग्रामविकास महत्व विचारात घेऊन प्रत्येक तालूका स्थरावर बांधकाम ऊप विभाग स्थापने करणे बाबत निर्देश ही दिलेले आहेत या सोबतच राज्य अभियंता संघटनेच्या अन्य प्रश्नावर ही बैठकीत चर्चा केली जाणार आहे जयकुमार गोरे मंत्री ग्राम विकास यांचे अध्यक्ष ते खाली संघटना पदाधिकारी तसेच ग्रामविकास प्राधान सचिव सह वरीष्ठ अधिकारी या बैठकीस ऊपस्थित राहणार आहेत.

## भरधाव टिप्परची दुचाकीला जोरदार धडक; २९ वर्षीय मुलगा जागीच ठार, वडील गंभीर जखमी

(शेख असद /दै.धर्मयोध्दा)

**पूर्णा**- तालुक्यातील ताडकळस टिपाईन्ट परिसरात मंगळवारी दि.२६ रोजी दुपारी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या बापलेकांपैकी २९ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला असून वडील गंभीर जखमी झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. भरधाव टिप्परने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.

मृत तरुणाचे नाव मोहम्मद सिद्दीक जिलानी शेख, वय २९ तर जखमी वडिलांचे नाव शेख जिलानी वझिरशहा, वय ५६, रा. सातेफळ ता. पूर्णा जि. परभणी असे आहे.






मिळालेल्या माहितीनुसार, मोहम्मद सिद्दिक हा आपल्या वडिलांसह दुचाकी क्रमांक एमएच २२/एवाय ५४०३ वरून सातेफळ येथून पूर्णा शहराकडे येत होता. दुपारी सुमारे ३:३० वाजण्याच्या सुमारास ताडकळस टिपाईन्ट येथे पूर्णेकडून ताडकळसकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या टिप्पर क्रमांक एमएच ११/एम/६८९९ ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की, दोघेही बापलेक रस्त्यावर दूर फेकले गेले. त्यांच्या डोक्यासह शरीराच्या विविध भागांना गंभीर दुखापत झाली असून घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता. अपघात होताच परिसरातील नागरिक व वाहनचालकांनी तत्काळ धाव घेत जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी मोहम्मद सिद्दिक यास मृत घोषित केले. त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ठेवण्यात आला आहे.

दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या शेख जिलानी यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पो.नि.सचिन बेंद्रे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पोहेकॉ. सुरेश चव्हाण व पोहेकॉ. देविदास सानप यांनी अपघातग्रस्त वाहने ताब्यात घेत वाहतूक सुरळीत केली. घटनेची माहिती नातेवाईकांना देण्यात आली असून पुढील तपास पूर्णा पोलीस करत आहेत.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao